DAY — **12** SEAT NUMBER | | | | | | |

| 2025 | VII | 08 | 1100 | J-428 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# GEOGRAPHY (39)

**Time : 3 Hrs.** **(8 Pages)** **Max. Marks : 80**

***सूचना :*** *(१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*
*(२) आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढावे.*
*(३) रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.*
*(४) नकाशा स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.*
*(५) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*
*(६) नकाशा पुरवणी मूळ उत्तरपत्रिकेस जोडावी.*

**प्र. १.** दिलेल्या सूचनेनुसार खालील उपप्रश्न सोडवा. **[ २० ]**

**( अ )** 'अ' 'ब' आणि 'क' स्तंभातील सहसंबंध ओळखून साखळी पूर्ण करा : (५)

| अ.नं. | 'अ' | 'ब' | 'क' |
|---|---|---|---|
| (१) | बर्फाच्छादित प्रदेश | (क) देशाची राजधानी | (य) हानिकारक शेती प्रकार |
| (२) | प्रशासकीय शहर | (ख) कृत्रिम उपग्रह | (र) विरळ लोकसंख्या |
| (३) | स्थलांतरित शेती | (ग) मानवी श्रमाचा वापर | (ल) संदेश वहन |
| (४) | गृह उद्योग | (घ) ध्रुवीय प्रदेश | (व) विणकर |
| (५) | जागतिक स्थान–निश्चिती प्रणाली (G.P.S.) | (ड) शेतीचा आकार खूप लहान | (श) टोकियो |

**( ब )** अचूक पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा. (५)

(१) लोकसंख्या बदलातील महत्त्वाचा घटक ......
- (अ) साक्षरता
- (ब) लिंग गुणोत्तर
- (क) जन्मदर
- (ड) वयोरचना

(२) ग्रामीण भूमी उपयोजन .......
- (अ) औद्योगिक
- (ब) व्यापार
- (क) मनोरंजन
- (ड) वने

(३) विस्तृत व्यापारी शेतीची वैशिष्ट्ये ....
- (अ) एक-पीक पद्धती, पाण्याचा वापर, उष्णकटिबंध, धान्य पिके
- (ब) एक-पीक पद्धती, यंत्राचा वापर, समशीतोष्ण कटिबंध, अन्नधान्य पिके
- (क) एक-पीक पद्धती, मानवी श्रमाचा वापर, विषुववृत्तीय प्रदेश, उद्यान शेती
- (ड) एक-पीक पद्धती, शास्त्रीय ज्ञानाचा वापर, उपोष्ण कटिबंध, डाळी उत्पादन

(४) खनिजांवर आधारित उद्योग ......
- (अ) लोहपोलाद उद्योग
- (ब) कापड उद्योग
- (क) साखर उद्योग
- (ड) अन्नप्रक्रिया उद्योग

(५) तृतीयक व्यवसाय ......
- (अ) शेती
- (ब) मालवाहतूक
- (क) मधनिर्मिती
- (ड) पेट्रोकेमिकल्स उद्योग

**( क )** 'बरोबर' की 'चूक' ते लिहा : (५)

(१) लोकसंख्येच्या प्रमाणात कार्यशील गटाचे प्रमाण जास्त असेल तर आर्थिक विकासाची शक्यता जास्त असते.

(२) तृतीयक व्यवसाय हे अनुत्पादक व्यवसाय आहेत.

(३) आफ्रिकेच्या कलहारी वाळवंटात 'एस्किमो' जमातीचे लोक आढळतात.

(४) साक्षरतेची व्याख्या देशानुसार बदलते.

(५) मानवी वस्तीच्या स्थानावर प्राकृतिक घटकांचा परिणाम होत नाही.

**( ड )** पुढील विधाने दिलेल्या सूचनेनुसार पूर्ण करा : (५)

(१) अचूक सहसंबंध ओळखा :

A : विधान, R : कारण

A: लोकसंख्या मनोऱ्यात रुंद तळ बालकांची संख्या अधिक असल्याचे दर्शवितो.

R: लोकसंख्या मनोऱ्याचे रुंद शीर्ष वृद्धांची संख्या अधिक असल्याचे द्योतक आहे.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे Aचे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

(२) अयोग्य घटक ओळखा :

(अ) मैदाने

(ब) सरोवरे

(क) पठारे

(ड) पर्वत

(३) खालील नागरी वस्तींचा लोकसंख्येनुसार चढता क्रम लावा :

(अ) महानगर

(ब) उपनगर

(क) नगर

(ड) महाकाय नगर

(४) अचूक गट ओळखा :

(अ) (१) समाजशास्त्र
(२) राज्यशास्त्र
(३) अर्थशास्त्र
(४) लोकसंख्याशास्त्र

(ब) (१) सामाजिक भूगोल
(२) राजकीय भूगोल
(३) आर्थिक भूगोल
(४) मृदा भूगोल

(क) (१) हवामानशास्त्र
(२) जीवशास्त्र
(३) भूगर्भशास्त्र
(४) सुदूर संवेदन

(ड) (१) इतिहास
(२) भूरूपशास्त्र
(३) मानसशास्त्र
(४) लोकसंख्याशास्त्र

(५) भांडवल गुंतवणुकीनुसार उद्योगांचे प्रकार चढत्या क्रमाने लिहा :

(अ) मध्यम उद्योग

(ब) लघू उद्योग

(क) मोठे उद्योग

(ड) सूक्ष्म उद्योग

**प्र. २. खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा ( कोणतेही चार ) :** [१२]

(१) हवामान या घटकाचा लोकसंख्या वितरणावर परिणाम होतो.

(२) लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे द्योतक असते.

(३) भारतातील छोटा नागपूर पठारावर खाणकाम व्यवसाय विकसित झाला आहे.

(४) प्रादेशिक विकास हा प्राकृतिक रचनेवर अवलंबून असतो.

(५) भूगोलाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे.

(६) विस्तृत शेती हा व्यापारी शेतीचा प्रकार आहे.

**प्र. ३. खालील फरक स्पष्ट करा ( कोणतेही तीन ) :** [९]

(१) विषुववृत्तीय वनातील लाकूडतोड व समशीतोष्ण वनातील लाकूडतोड

(२) लोकसंख्या संक्रमणाचा पहिला टप्पा व लोकसंख्या संक्रमणाचा पाचवा टप्पा

(३) जल वाहतूक व हवाई वाहतूक

(४) प्राकृतिक प्रदेश आणि राजकीय प्रदेश

(५) निसर्गवाद व संभाव्यवाद

**प्र. ४.** **( अ )** तुम्हास दिलेल्या जगाच्या नकाशा आराखड्यामध्ये पुढील बाबी योग्य चिन्हांच्या साहाय्याने दाखवा आणि सूची तयार करा (कोणतेही सहा): (६) [११]

(१) सर्वात कमी लोकसंख्येचा खंड

(२) स्थलांतरितांचे आकर्षण असणारे भारतातील एक शहर – मुंबई

(३) सर्वाधिक आयुर्मानाचा देश – जपान

(४) प्रशासकीय शहर – मॉस्को


(५) लंडन – न्यूयॉर्क हवाई मार्ग

(६) सुएझ कालवा

(७) दक्षिण अमेरिकेतील व्यापारी पशुपालनाचे क्षेत्र – पंपाज

(८) दक्षिण आफ्रिकेतील एक औद्योगिक प्रदेश – किंबर्ले – वीटवॉटरसँड

**( ब )** खालील नकाशाचे वाचन करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (५)



प्रश्न :

(१) नकाशा काय दर्शवितो?

(२) पर्थ आणि सिडनी हे औद्योगिक प्रदेश कोणत्या खंडात आढळतात?

(३) संयुक्त संस्थानांतील औद्योगिक प्रदेशाचे नाव लिहा.

(४) कोणत्या खंडात औद्योगिक विकास कमी झालेला दिसतो?

(५) ओसाका, कोबे आणि क्योटो औद्योगिक प्रदेश कोणत्या देशात आढळतात?

**प्र. ५. खालील विषयावर संक्षिप्त टिपा लिहा ( कोणत्याही तीन ) :** **[१२]**

(१) ग्रामीण भूमी उपयोजन

(२) मासेमारी व्यवसायावर परिणाम करणारे घटक

(३) संदेशवहनातील कृत्रिम उपग्रहांचे महत्त्व

(४) भारतातील प्रादेशिक विषमता : कारणे

(५) भूगोलाचे स्वरूप

**प्र. ६. ( अ )** खालील उताऱ्याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (४) **[८]**

वयोरचना

लोकसंख्येच्या वयोरचनेचे तीन मूलभूत घटक आहेत. यामध्ये जन्मदर, मृत्युदर आणि स्थलांतर यांचा समावेश होतो. क्लार्क (१९७२) च्या मते वय संरचनेचे हे तीन घटक परस्पर अवलंबित आहेत. यापैकी एकामध्ये कोणताही बदल इतर दोनवर परिणाम करू शकतो. या परिवर्तनाद्वारे सामाजिक–आर्थिक परिस्थिती वयाच्या संरचनेवर प्रभाव टाकतात. जन्मदर हा वेगवेगळ्या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण ठरवतो. म्हणूनच लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशियातील देश ज्यांना उच्च जन्मदराने वैशिष्ट्यीकृत केले आहे, तरुण वयोगटामध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतात. या खंडातील बहुतेक देशांमध्ये लोकसंख्येच्या सुमारे दोन पंचमांश लोक १५ वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत. २००१च्या जनगणनेनुसार भारतातील ३६% लोकसंख्या १५ वर्षांपेक्षा कमी आहे.

याउलट कमी जन्म दर आणि दीर्घ आयुर्मान असलेल्या देशांमध्ये त्यांच्या लोकसंख्येपैकी एक चतुर्थांश लोकसंख्या तरुण वयोगटामध्ये आहे परंतु या देशातील वृद्‌ध वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण तुलनेने मोठे आहे. वायव्य युरोप आणि उत्तर अमेरिकेतील बहुतेक देश, सी.आय.एस देश, ऑस्ट्रेलिया आणि जपान या श्रेणीतील आहेत. प्रजननक्षमतेमध्ये सतत खालच्या दिशेने जाणारा कल वृद्‌ध वयोगटातील लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होण्यास हातभार लावतो.

प्रश्न :

(१) लोकसंख्या वयोरचनेचे मूलभूत घटक कोणते?

(२) कोणत्या खंडामध्ये तरुण वयोगटाची लोकसंख्या जास्त आहे?

(३) २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील १५ वर्षांपेक्षा कमी वयोगटाची किती टक्के लोकसंख्या आहे?

(४) वृद्‌ध वयोगटातील लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ होण्यास कोणता घटक हातभार लावतो?

**( ब )** आकृती काढून नावे द्या (कोणतेही <u>दोन</u>) : (४)

(१) त्रिकोणाकृती वस्ती

(२) संदेशवहन या तृतीयक आर्थिक क्रियेचे वर्गीकरण

(३) प्रादेशिक असंतुलन कमी करण्यासाठी पायाभूत सुविधा आणि उत्तेजनाच्या तरतुदीचा तक्ता

**प्र. ७. खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तरे लिहा ( कोणताही <u>एक</u> ) :** **[८]**

(१) लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे मानवी घटक उदाहरणासह लिहा.

(२) कच्च्या मालाच्या स्रोतानुसार उद्योगांचे वर्गीकरण करून सविस्तर माहिती लिहा.

◆◆◆